आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । मंगळवार, ९ मार्च २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : २० । पाने : ४ । मूल्य २ ₹



## वुमेन्स पॉवर

इंफाळ : लिसीप्रिया ही मणिपूरची ९ वर्षाची पर्यावरण कार्यकर्ती आहे. पर्यावरणातील प्रदूषण यावर तिचे काम आहे. तिने केलेल्या कामाबद्दल तिला अनेक जागतिक पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. लिसीप्रियाच्या कर्तृत्ववाला महिलादिनानिमित्त 'वर्तमान'चा सलाम!

# 'मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातील भ्रष्टाचाराची चौकशी व्हावी'

विशेष प्रतिनिधी

मुंबई : राज्यात सत्तारूढ महाविकास आघाडी सरकार सर्व पातळ्यांवर चांगले काम करत असताना विरोधकांकडून मात्र भ्रष्टाचाराचे बेछूट आरोप केले जात आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षात शेकडो कोटींचा भ्रष्टाचार झालेला असून त्याची महाविकास आघाडी सरकारने कसून चौकशी लावावी अशी आग्रही मागणी विधान परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी केली. राज्यपालांच्या अभिभाषणानंतर चर्चेच्यावेळी विधान परिषद आमदार मिटकरी बोलत होते.

आमदार अमोल मिटकरी पुढे बोलताना म्हणाले, सत्तारूढ महाविकास आघाडी सरकार कोरोनाशी चार हात करताना यशस्वी लढा देत असताना विरोधी पक्ष मात्र भ्रष्टाचारांचे बेछूट आरोप करत आहेत, ते थांबले पाहिजे उलट तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षात शेकडो कोटींचा भ्रष्टाचार झाला आहे, याकडे सभागृहाचे लक्ष वेधले. माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षात मार्च २०१५ ते ऑक्टोबर २०१९ या कार्यकाळात झालेल्या शेकडो कोटींच्या भ्रष्टाचाराची चौकशी व्हावी, असे पत्र मुख्यमंत्र्यांना दिलेले आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर ५२६ कोटी रूपये वितरित केल्याचे नमूद आहे, मात्र दुसरीकडे १५०० कोटी रूपये खर्च केल्याचा दावा केला जात आहे. ही तफावतच भ्रष्टाचार झाल्याची पावती देत आहे, असेही आमदार मिटकरी म्हणाले. त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षात झालेल्या भ्रष्टाचाराची महाविकास आघाडी सरकारने कसून चौकशी करावी, अशी आग्रही मागणी आमदार अमोल मिटकरी यांनी केली. दरम्यान, या प्रकरणातील दोषींवर शासनाने चौकशी करून कारवाई करावी अशी मागणीही मिटकरी यांनी लावून धरली आहे.



### मंत्री सुभाष देसाई यांची आरोग्यमंत्र्यांकडे तक्रार

भाजपा सरकारच्या काळात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षात मोठा गैरव्यवहार झाला असून त्याची कसून चौकशी व्हावी, अशी मागणी महाविकास आघाडी सरकारमधील ज्येष्ठ मंत्री सुभाष देसाई यांनी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांच्याकडे केली आहे. हे प्रकरण गंभीर असून याकडे आरोग्य मंत्र्यांनी लक्ष द्यावे असेही पत्रात मंत्री देसाई यांनी म्हटले आहे.

## फास्टट्रॅकन्यूज



### प्रभू वैद्यनाथ मंदिर १६ मार्चपर्यंत बंद

बीड : ११ मार्च रोजी महाशिवरात्री असून यंदा कोरोनाच्या वाढत्या संसर्गामुळे जिल्ह्यातील सर्व महादेवाची मंदिर पूर्ण दिवसभर बंद राहणार आहेत. वैद्यनाथ मंदिर परळी येथील यात्रा महोत्सव रद्द करण्यात आला आहे. तर वैद्यनाथ मंदिर हे ८ मार्च ते १६ मार्च बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यानच्या काळात विधिवत पूजा व सर्व विधी करण्याचे अधिकार मंदिर विशवस्त व पुजारी यांना राहतील, असे आदेश बीडचे जिल्हाधिकारी रवींद्र जगताप यांनी आज दिले आहेत.

### मराठी साहित्य संमेलन स्थगित

नाशिक : राज्यातील कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील नियोजित ९४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनरद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. दि.२६ ते २८ मार्च दरम्यान नाशिक येथे साहित्य संमेलन होणार होते. साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांनी हा निर्णय जाहीर केला आहे. पुढच्या काळात कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यास संमेलन घेण्याबाबत विचार केला जाईल, असेही ठाले पाटील यांनी सांगितले. संमेलनासाठीची जवळपास सर्व तयारी झाली होती. अनेक साहित्यिकांना निमंत्रणे पाठवली होती. सध्याची परिस्थिती पाहता आम्ही राज्यातील साहित्य संस्थांशी चर्चा केली. या चर्चेनंतर साहित्य संमेलन पुढे ढकलण्याचा निर्णय घेतल्याचे साहित्य महामंडाळाने सांगितले.

### गोव्यातही महाविकास आघाडीचा प्रयोग



पणजी : येत्या विधानसभा निवडणुकीसाठी गोव्यातही महाआघाडी स्थापन करण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे शिवसेनेचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी पणजीत पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले.मात्र, महाराष्ट्रातील फॉर्म्युला गोव्याच्या बाबतीत लागू होणार नसल्याचे त्यांनी सांगितले. गोवा भेटीवर असलेले राऊत शिवसेनेच्या गोवा कार्यालयात पत्रकारांशी बोलताना म्हणाले, गोव्यात सरकारचेही अस्तित्व दिसत नाही आणि विरोधी पक्षाचेही अस्तित्व दिसत नाही. त्यामुळे सर्व विरोधकांना एकत्र आणून भाजपविरोधात महाआघाडी स्थापन करणे शक्य आहे. कोणत्याही परिस्थितीत सेना गोव्यात २० जागा लढविणार आहे आणि गोव्यात विरोधी पक्ष म्हणून भूमिका बजावणार आहे असेही ते म्हणाले.

# 'अर्थ'पूर्ण संकल्प

## ३१ लाख २३ हजार शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ

प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सादर केला. महाविकास आघाडीचा हा दुसरा अर्थसंकल्प आहे. विधानसभेत सोमवारी दुपारी २ वाजता अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर करण्यास सुरुवात केली. राज्याचे अर्थराज्यमंत्री शंभुराजे देसाई विधान परिषदेत अर्थसंकल्प सादर केला. राज्यातील ३१ लाख २३ हजार शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळाला, असे अजित पवार यांनी यावेळी सांगितले.कृषी क्षेत्राने राज्याच्या अर्थव्यवस्थेला सावरले, असे नमूद करत राज्यात २७८ सिंचन प्रकल्पाची कामे सुरू आहेत. तसेच बळीराजा जलसिंचन प्रकल्पाअंतर्गत ९१ प्रकल्पांची कामे सुरू असल्याची माहिती अजित पवार यांनी यावेळी दिली.



### विदर्भात संत्रा संशोधन केंद्र उभारणार

राज्य सरकारने सुलभ पद्धतीने महात्मा फुले कर्जमाफी योजना राबवण्यात आली. याचा ३१ लाख २३ हजार शेतकऱ्यांना लाभ मिळाला. विकेल ते पिकेल योजनेसाठी २१०० कोटी किमतीचा बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय प्रकल्प राबवला जात आहे. प्रत्येक तालुक्यात अहिल्याबाई होळकर रोपवाटिका योजना सुरू करण्यात येईल. तर, विदर्भातील अमरावतीमध्ये संत्रा संशोधन केंद्र सुरू करणार असल्याचेही अजित पवार यांनी सांगितले.

### ३ लाखांपर्यंत पीक कर्ज शून्य टक्के

शेतकरी बांधवांना ३ लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज शून्य टक्के दराने दिले जाईल. यंदा ४२ हजार कोटींचे पीक कर्ज वाटप करण्यात आले. बाजार समित्यांच्या बळकटीसाठी २ हजार कोटी रुपयांची योजना राबवणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

## अर्थसंकल्पातील महत्त्वपूर्ण घोषणा

सारथी, बार्टी संस्थांना प्रत्येकी १५० कोटी रुपयांची तरतूद, शासकीय रुग्णालयांमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा बसवणार, शाळकरी मुलींना बसने मोफत प्रवास, घर महिलेच्या नावावर झाल्यास मुद्रांक शुल्कात १ टक्के सवलत, ३ लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज शून्य टक्के दराने, मद्यावरील (दारु) व्हॅटमध्ये ६० वरुन ६५ टक्के वाढ, उस्मानाबाद, सिंधुदूर्ग, अमरावती, परभणीत मेडिकल कॉलेज उभारणार, पुण्यात रिंग रोडची घोषणा, २४ हजार कोटींचा निधी, आरोग्य सेवेसाठी ७ हजार कोटींचा प्रकल्प, पुणे, नगर, नाशिक २३५ किमीचा रेल्वे मार्ग उभारणार, मुंबईतली कोस्टल मार्ग २०२४ पर्यंत पूर्ण करणार, राज्यातील प्राचीन मंदिरांचे ८ प्राचीन मंदिरांचे जतन करणार, बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच्या खर्चासाठी यंदा ४०० कोटी, नाशिक–मुंबई मार्गावर मेगा इलेक्ट्रीक चार्जिंग सेंटर उभारणार, पूर्वमुक्त मार्गाला विलासराव देशमुखांचे नाव देणार, दरम्यान, घराची नोंदणी महिलेच्या नावावर झाल्यास मुद्रांक शुल्कात १ एप्रिल २०२१ पासून सवलत दिली जाणार असल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे.

### प्रगतीचा वेग वाढवणारा अर्थसंकल्प : नाना पटोले



विद्यार्थीनी, गृहिणी, कष्टकरी महिलांसाठी राज्य सरकारनं नव्या योजना जाहीर केल्या आहेत. घराची नोंदणी महिलांच्या नावावर केल्यास मुद्रांक शुल्कात सवलत देण्यात येणार आहे. राज्यातील ग्रामीण भागातील मुलींना शाळेत जाण्यासाठी मोफत एसटी प्रवास उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. शहरातील महिलांच्या सुरक्षित प्रवासासाठी आणखी तेजस्विनी महिला बस उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. राज्य राखीव पोलीस दलात राज्यातील पहिलीच स्वतंत्र महिला पोलीसांची तुकडी स्थापन करण्यात येणार आहे. राज्यातील युवकांसाठी कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शिकाऊ उमेदवार प्रोत्साहन योजना सुरू करण्यता येणार असून शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा ५ हजार रुपये इतकी रक्कम देण्यात येणार आहे. योजनेच्या माध्यमातून युवक–युवतींना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. या अर्थसंकल्पातील तरतुदींच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीला चालना मिळणार असून राज्याच्या प्रगतीचा वेगही वाढणार आहे अशी प्रतिक्रिया नाना पटोले यांनी दिली.

### दिलासा देणारा अर्थसंकल्प : अमरसिंह पंडित



सरकारने आज मांडलेला अर्थसंकल्प सर्वोत्तम आणि आदर्श असून संपुर्ण राज्यासह बीड जिल्हाच्या विकासासाठी अर्थसंकल्पात चांगले निर्णय झाले आहेत. ३ लाख रुपयांपर्यंत कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना ०% व्याज दराने कर्ज उपलब्ध करून देण्याच्या घोषणेसह अर्थसंकल्पातून बीड जिल्ह्यातील तिर्थक्षेत्रांच्या विकासासाठी निधीचा वर्षाव केला असून अर्थमंत्री अजित पवार आणि जिल्हाचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी बीड जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला मोठा हातभार लावला असल्याचे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. राज्याच्या अर्थसंकल्पावर प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रतिक्रिया देताना ते बोलत होते. प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात अमरसिंह पंडित पुढे म्हणाले की, राज्याचा अर्थसंकल्पात अतिशय चांगले आणि स्वागतार्ह निर्णय घेण्यात आले आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार आणि जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे आभार प्रसिद्धी पत्रकात शेवटी मानले आहेत.

# पखवाजाला हवी जागतिक ओळख

## पंडीत उध्दवबापू आपेगावकर यांचे प्रतिपादन

पणजी : जगविख्यात पखवाजवादक पंडीत उध्दवबापू आपेगावकर यांचा ९ मार्च हा वाढदिवस त्याअनुषंगाने आपेगावकर यांची विशेष मुलाखत पुनःर्मुद्रित करत आहोत.

टीम वर्तमान

पखवाज वादन ही अस्सल भारतीय कला आहे. या कलेला विविध कोंदणात मांडून संपूर्ण जगाला पखवाज वादन काय आहे, याची ओळख करून देणार असल्याची माहिती वर्तमानशी बोलतानाजागतिक दर्जाचे पखवाज वादक उद्धवबापू आपेगावकर यांनी दिली. प्रसिध्द धृपद गायक उस्ताद सयुद्दीन डागर यांच्या समवेत आपेगावकर गोवा दौऱ्यावर आले असता त्यांनी वर्तमानशी संवाद साधला. आपेगावकर म्हणाले, वारकरी सांप्रदायाच्या मुशीतूनच मी तयार झालो. वारकरी सांप्रदाय हा माझा प्राण आहे. याचा मला अभिमान वाटतो. आज आळंदी, पंढरपूर येथे पखवाज वादनाचे प्रशिक्षण दिले जात असले तरी ही कला या प्रशिक्षण केंद्रातून मर्यादित ठेवली जात आहे, ही खंत मनात असल्याने पखवाज वादनाला जागतिक ओळख निर्माण करून देण्यासाठी मी धडपड करत आहे, असेही ते म्हणाले.

कौटुंबिक पार्श्वभूमीवर बोलताना आपेगावकर पखवाजवादनाची माझीही चौथी पिढी आहे. माझे पणजोबा तुळजाराम, आजोबा मारोतराव शिंदे हे पट्टीचे पखवाजवादक होते. त्यानंतर हा वारसा माझे वडील पद्मश्री शंकरबापू आपेगावकर यांनी पुढे चालवला. खऱ्या अथनि पखवाजाला भारताच्या बाहेर ओळख निर्माण करून देण्याचे कार्य वडिलांनी केले. त्यांचा वारसा आता मी प्रामाणिकपणे चालवत आहे. या क्षेत्रातील माझे गुरू वडीलच आहेत. वडिलांनी दाखवलेल्या मार्गावरच निष्ठेने पाऊल टाकत आहे. खेड्यात राहून धृपद गायकीची ओळख महाराष्ट्राला माझ्या वडिलांनी करून दिली हे आवर्जून त्यांनी नमूद केले. पुढे बोलताना ते म्हणाले, आज मी महाराष्ट्रातील एका शेतकरी कुटुंबात जन्मलो असलो तरी पखवाजवादनाच्या निमित्ताने संपूर्ण जगात कार्यक्रम झाले आहेत. आज पखवाजवादनाकडे जग मोठ्या आत्मियतेने पाहत आहे. फ्रान्स, नेदरलॅण्ड, बेल्जिअम, जर्मनी, स्वित्झर्लण्डसह अनेक देशात माझा शिष्यवर्ग आहे. ज्या–ज्यावेळी वेळ मिळेल तेव्हा मी तेथे जाऊन पखवाज वादनाची कला शिकवत आहे. युरोपला 'ओपेरा' नावाचे शास्त्रीय संगीत आहे. त्यातही मी पखवाजवादन करत आहे. तसेच मुस्लिम समाजातील सुफी' या पवित्र संगीतातही माझे पखवाज वादन झाले आहे.

जगातील विविध देशातील संगीतात पखवाजवादनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी माझी अविरत धडपड चालू आहे. पखवाजाला विविध कोंदणात मांडून या कलेला नवी ओळख करून मी देणार आहे, असेही ते म्हणाले. जागतिक पातळीवर महाराष्ट्राचा ज्या–ज्यावेळी विचार होतो. तेव्हा लावणी कला पुढे केली जाते. कला ही कोणतीही श्रेष्ठ असते. परंतु पखवाज वादन ही महाराष्ट्राची घरंदाज कला आहे. या कलेकडे महाराष्ट्र शासन जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहे, असेही ते म्हणाले.



**गोवा कलाप्रेमी राज्य**

गोव्याला २२ वर्षापूर्वी आलो होतो. गोवा कला आणि संस्कृतीच्या जपवणुकीसाठी प्रयत्न करणारे कलाप्रेमी राज्य आहे, अशी त्यांनी गोव्याबद्दल प्रतिक्रिया दिली.

## संपादकीय

# जय मराठी, जय विज्ञान!

विज्ञान आणि विवेकाचा जागर करत असताना मातृभाषा मराठी वरील प्रेमही तसूभरही कमी करू नये. सध्याचं युग विज्ञानयुग आहे. त्यामुळे विज्ञाननिष्ठा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन पसरवणं गरजेचं आहे. आधुनिकता म्हणजे विवेक आणि विज्ञान असं समीकरण स्थिर होणं गरजेचं आहे. कारण विज्ञान शिकूनही वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव असेल तर काहीही साध्य होणार नाही. शोध आणि सिद्धांत जाणून घेण्याबरोबरच जगणं अर्थपूर्ण आणि सुकर करण्यासाठी विज्ञानाचा उपयोग करुन घेतला पाहिजे. कारण हे दुधारी शस्त्र आहे. बजया आणि वाईट अशा दोन्ही अंगांनी त्याचा उपयोग करून घेता येतो. म्हणूनच माणसाचं हित हाच विज्ञान आत्मसात करण्यामागचा अंतिम उद्देश असायला हवा. कुठलीही गोष्ट आंधळेपणानं न करण्याचं सूत्र विज्ञानाकडून शिकता येतं आणि पटलं तरच स्वीकारायचं हा दृष्टिकोन वैज्ञानिक विचारसरणीमुळे मिळतो. सध्या विज्ञानाच्या नानाविध शाखा विकसित झाल्या असून विज्ञानविकासाला अफाट गती लाभली आहे. मात्र अशा या विज्ञानाचं आकलन होण्यासाठी मातृभाषेतून शिकलं पाहिजे हा विचार जगानं मान्य केला आहे. जगातल्या अनेक देशांमध्ये प्रगत विज्ञान शिकवण्यासाठी त्या त्या देशातल्या भाषेचाच माध्यम म्हणून स्वीकार होतो. भारतात बोली भाषा ही आपली समृद्धी आहे. या देशात संविधानानं संमत केलेल्या प्रमुख २२ भाषा आहेत. याखेरीजही अनेक भाषांमधून व्यवहार होत असतो. या स्थितीमुळे आपल्या देशाची कोणतीही एक भाषा नाही. हिंदीलादेखील राष्ट्रभाषेचा दर्जा नाही. अनेक वर्ष इंग्रजी भाषिकांचं राज्य झेलल्यामुळे या भाषेला सरावलेल्या आणि रुळलेल्या वर्गानं इंग्रजी भाषेलाच संपर्क भाषेचा दर्जा दिला आणि या देशात इंग्रजांनीच आपल्या भाषेतून आधुनिक विज्ञान आणल्यामुळे तो स्थिर झाला. न्यायव्यवस्था, प्रशासन व्यवस्था, बँकिंग आदी ठिकाणी इंग्रजीचा वापर होत असल्यामुळे आपण इंग्रजीची कास धरत गेलो. यातूनच एक अभिजन वर्ग निर्माण झाला; ज्याचं इंग्रजीवर प्रभुत्व होतं. साहजिकच इंग्रजीची जाण हे या वर्गाचं वाढीव कौशल्य ठरलं आणि त्यांना अधिक संधी उपलब्ध होत गेल्या. कोलकाता, मुंबई आणि चेन्नई या शहरांमध्ये सर्वप्रथम विद्यापीठांची स्थापना झाल्यामुळे या तीन राज्यांनी इंग्रजीसंदर्भात विशेष प्रगती केली. विशेषत: इंग्रजी भाषिक देशांमधल्या (अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया आदी आयटी क्षेत्र विस्तारलेल्या) रोजगारसंधींसाठी त्यांना प्राधान्य दिलं गेलं. भारतामध्ये इंग्रजीची प्रतिष्ठा वाढत गेली आणि इंग्रजी म्हणजे ज्ञान हा गैरसमज पसरत गेला. मात्र इंग्रजी ही मराठीप्रमाणे केवळ एक भाषा आहे. त्यातून ग्रहण करता येणारं ज्ञान मराठीमधूनही मिळवता येतं, हा विचार मागे पडला आणि त्यातूनच मराठीची पिछेहाट होत गेली. केवळ साहित्य म्हणजे भाषा नसते तर भाषा हे ज्ञान आणि विज्ञान ग्रहण करण्याचं प्रभावी माध्यमही असतं. आपल्याकडे हा दृष्टिकोनच दिसत नाही. आजही ८० ते ८५ टक्के प्रबंध इंग्रजीतूनच लिहिले जातात. कारण आपण इंग्रजी भाषा हीच ज्ञानभाषा मानली आहे. राज्यातच नव्हे तर आपल्या संपूर्ण देशातच हा समज इतका दृढ आहे की, मध्यंतरी आंध्र प्रदेशमध्ये जगमोहन रेड्डी यांनी राज्यातल्या सगळ्या शाळा इंग्रजी माध्यमातून करण्याचा निर्णय घेतला. न्यायालयानं स्थगिती दिल्यामुळे तसं झालं नाही. आपल्याकडेही इंग्रजी आणि मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये मोठी दरी आहे. इंग्रजी न जाणणाजया माणसाला कमी लेखण्याची आपली मानसिकता आजही कायम आहे. त्यामुळेच मध्यंतरी मी वर्णन केल्याप्रमाणे श्रीमंत इंग्रजी विरुद्ध गरीब मराठी' अशी स्थिती पाहायला मिळते. आज देशातले २५ टक्क्यांपेक्षा अधिक विज्ञार्थी इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतात. म्हणजेच प्रत्येक चौथा मुलगा मातृभाषेत शिकत नाही. असं असताना मुलाची घरातली भाषा वेगळी आणि शाळेतली वेगळी अशी द्विधा स्थिती उत्पन्न होते आणि विज्ञार्थ्यांच्या आकलनशक्तीवर याचा थेट परिणाम होतो. विशेषत: इंग्रजीतून शिकवल्या जाणाजया विज्ञान आणि गणिताच्या आकलनावर नकारात्मक परिणाम होऊन त्याची शैक्षणिक प्रगती खुंटते. याच कारणामुळे विज्ञानामध्ये पारंगत होऊन संशोधक, शास्त्रज्ञ होणाजया भारतीय विद्यार्थ्यांचं प्रमाण अन्य देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक मुलाला मातृभाषेतून अधिकाधिक शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे. नव्या शिक्षण धोरणामध्ये किमान आठवीपर्यतचं शिक्षण मातृभाषेतून मिळण्याची तरतूद केली आहे. परंतु त्याचा लाभ घ्यायला हवा. दाक्षिणात्य राज्यांमध्ये शालेय अभ्यासक्रमात मातृभाषा सक्तीचा कायदा केला गेला. आपल्याकडेही मागच्या वर्षी हा कायदा झाला. त्यामुळे किमान इंग्रजी शाळांमध्ये द्वितीय भाषा म्हणून मातृभाषा शिकवली जाईल. आता विज्ञानशाखेतलं संपूर्ण शिक्षण मातृभाषेतून देण्याचे प्रयत्नही सुरू झाले आहेत. हे सर्वात प्रथम तामिळनाडूने जाणलं आणि १९८१ मध्ये तामिळ विद्यापीठ स्थापन केलं. तंजावरला ९०० एकर परिसरात हे विद्यापीठ वसलं आहे. त्यानंतर कर्नाटक सरकारनं हंपी इथे कन्नड विद्यापीठ सुरू केलं. २०११-१२ मध्ये कोचीला मल्लयाळी विज्ञापीठ सुरू करण्यात आलं. या सर्व विज्ञापीठांमधून पदव्युत्तर पातळीपर्यतचे सर्व शाखांमधले अभ्यासक्रम आपापल्या भाषेत उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न सुरू आहे. म्हणजेच एखाद्या विज्ञार्थ्याला तमिळ अथवा कन्नडमधून एमए अथवा एमएससईपर्यतचं शिक्षण घेता येईल. या धर्तीवर मराठी माध्यमातूनही शिक्षण मिळण्याची सोय व्हायला हवी. तसं झालं तर विद्यार्थ्यांना हे उच्च शिक्षण अधिक सोप्या पद्धतीने घेता येईल. मराठी माध्यमात शालेय शिक्षण घेऊन मी नांदेडला कॉलेजमध्ये शास्त्रशाखेत प्रवेश घेतला तेव्हा एक केरळी प्राध्यापिका शरीरशास्त्र शिकवायला आल्या. त्यांचं फर्ड इंग्रजी आम्हा मराठी विद्यार्थ्यांच्या डोक्यावरून जायचं. विषय समजायला त्रास होत होता. एकदा त्या आम्हाला किडनीची माहिती देत होत्या. रक्त शुद्ध करणं हे किडनीचं कार्य असल्याचं समजावत होत्या. मात्र इंग्रजीत त्या संकल्पना काही केल्या आम्हाला कळत नव्हत्या. तेव्हा त्यांनी कसंबसं हिंदीत समजावलं, तुम्ही महाराष्ट्रवासी श्रीखंड बनवताना पांढऱ्या कपड्यात दही बांधून ठेवता तेव्हा पाणी निघून जातं आणि चक्का उरतोअगदी तशाच पद्धतीने किडनीचं काम होतं. शरीरातली अशुद्ध द्रव्यं लघवीवाटे निघून जातात असं त्यांनी सांगितलं तेव्हा संकल्पना स्पष्ट झाली. मातृभाषेतून शिक्षण घेणं. हा जागतिक सिध्दांत आहे. विज्ञानाची सांगड घालत असताना जय विज्ञान म्हणत असताना मराठीचा गजर तेवढाच जागृत ठेवणे आपल्या आहे.

# डॉ.स्वाती मोहन यांची 'मंगळ'भरारी

**नासाचं मार्स पर्सिवरन्स रोवर १८ फेब्रुवारीला मंगळ ग्रहाच्या जेझिरो विवरात उतरलं आणि एकच जल्लोष झाला. 'रोवर पूर्णपणे सुरक्षित असून मंगळ ग्रहावरच्या जीवसृष्टीचे पुरावे शोधण्यासाठी तयार आहे.' अशी घोषणा केली त्या होत्या भारतीय वंशाच्या वैज्ञानिक स्वाती मोहन. गेली ८ वर्ष त्या या प्रोजेक्टवर काम करतायंत.**

**वर्तमान स्पेशल**

**अक्षय शारदा शरद**

लहानपणी आपली काहीना काही स्वप्न असतात. काही पूर्ण होतात. काही अपूर्ण राहतात. हे कोवळं वय खरंतर मजा मस्ती करायचं असतं. धावायचं, पळायचं, पडायचं असतं. पण हेच जग आपल्याला नवी नजरही देतं. आजूबाजूला दिसतंय, घडतंय त्याबद्दल कुतूहल निर्माण करतं. आयुष्याला आकार देतं. अशावेळी आपली स्वप्न स्वप्न राहत नाहीत. त्या दिशेनं चालायला आपण सुरवात करतो. आपण धडपडतो. स्वप्नांचा पाठलाग करत आपला शोध सुरू होतो. एक नवं जग शोधण्याचा. डॉ.स्वाती मोहन भारतीय वंशाच्या अमेरिकन वैज्ञानिक. बालपणातल्या एका टर्निंग पॉईंटमुळे अंतराळातल्या जगानं त्यांना खुणावलं. त्यांना प्रश्न पडायचे. त्या प्रश्नांची उत्तरं त्या स्वतःच शोधायचा प्रयत्न करायच्या. खूप सारं वाचायच्या. शेवटी या कुतूहलानंच त्यांना नासासारख्या अंतराळ संशोधन संस्थेत पोचवलं. मंगळावरच्या मानवी अस्तित्वाच्या पाऊलखुणा शोधायचा प्रयत्न नासा करतंय. या मोहिमेत भारताच्या या लेकीनं महत्वाची भूमिका बजावलीय. नासाचं मार्स पर्सिवरन्स रोवर १८ फेब्रुवारीला मंगळ ग्रहाच्या जेझिरो विवरात उतरलं आणि एकच जल्लोष झाला. ते लँड झाल्याची घोषणा केली ती डॉ.स्वाती मोहन यांनी. मंगळावरच्या जीवसृष्टीचा शोध घेण्यासाठी हे ऐतिहासिक पाऊल ठरेल. त्यासोबतच या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या स्वाती यांचं नावंही इतिहासात नोंदवलं गेलंय.

एका सिरीजनं कुतूहल वाढवलं

स्वाती मोहन यांचा जन्म दक्षिण भारतातल्या कर्नाटकमधल्या बंगळुरूचा. त्या एक वर्षाच्या असताना त्यांचं कुटुंब भारतातून अमेरिकेत स्थायिक झालं. व्हर्जिनिया आणि वॉशिंग्टन डीसीत बालपण गेलं. वॉशिंग्टन डीसीमधे सुरवातीचं शिक्षण झालं. स्टार ट्रेक



अमेरिकेतली विज्ञानावर आधारित मनोरंजन करणारी एक सिरीज आहे. वयाच्या अवघ्या ९ व्या वर्षी या स्टार ट्रेकमधल्या एका एपिसोडनं त्यांच्यावर भुरळ घातली. स्टार ट्रेकचा एक एपिसोड पाहत असताना अंतराळातल्या एका चित्रानं त्यांना आपल्याकडे ओढलं. हाच त्यांच्या आयुष्यातला टर्निंग पॉईंट ठरला. अंतराळातल्या अद्भुत जगानं त्यांच्या मनात कुतूहल निर्माण केलं. त्या वेगवेगळे फोटो पाहत रहायच्या. याच फोटोंनी त्यांना खगोलशास्त्रासाठी वरदान ठरलेल्या 'हबल स्पेस टेलिस्कोप' या नासाच्या अंतराळ दुर्बिणीची ओळख करून दिली. शाळेत असतानाच अंतराळ क्षेत्रात करियरचा निर्णय पक्का झाल्याचं त्यांनी बीबीसीला दिलेल्या मुलाखतीत म्हटलंय. पण बालपणी शास्त्रज्ञ नाही तर लहान मुलांचा डॉक्टर व्हायचं स्वप्न त्यांनी पाहिलं होतं. अंतराळातल्या गोडीमुळे नोकरी मिळेल का याबद्दल त्यांना शंका वाटायची. हेच त्यामागचं खरं कारण होतं.

जगाच्या ओढीने नासात पोचवलं

वयाच्या १६ व्या वर्षी त्या फिजिक्सकडे वळल्या. चांगले शिक्षक मिळाले. त्यांची सोबत मिळाली. मार्गदर्शनही मिळालं. त्यामुळेच अवकाश संशोधन क्षेत्रात करियरची संधी त्यांना दिसू लागली. त्यासाठी त्यांनी इंजिनियरिंगचा मार्ग निवडला. २००० ला कॉर्नेल युनिवर्सिटीत प्रवेश घेतला. या युनिवर्सिटीतुन मॅकेनिकल आणि अवकाश या विषयात बीएसची डिग्री घेतली. तर २०१० ला एमआयटीमधून वैमानिक आणि अंतराळवीर यात एमएस आणि पीएचडीचं शिक्षण पूर्ण केलं. डॉक्टर व्हायचं स्वप्न वेगळ्या अर्थाने का होईना पण पूर्ण झालं. त्या अंतराळ वैज्ञानिक बनल्या. अंतराळ आणि नासा हे एक घट्ट समीकरण आहे. स्वाती त्याचाच एक भाग बनल्या. शनी आणि चंद्राच्या कॅसिनी आणि ग्रेल या मिशनसाठी त्यांनी नासामधे काम केलं. त्या कामामुळेच स्वाती यांना मंगळच्या पर्सिवरन्स मिशनमधे महत्त्वाची जबाबदारी मिळाली. सर्वसामान्य माणसांना माहीत नाहीत अशा जगभरातल्या जागा आपल्याला पहायच्यात, समजून घ्यायच्यात, असं स्वाती यांनी नासाच्या आपल्या प्रोफाइलमधे म्हटलंय.




नियंत्रण आणि लँडिंगचं नेतृत्व

मंगळ ग्रहावरच्या विषुववृत्ताच्या जेझिरो नावाच्या खोल विवरात पर्सिवरन्स रोवर १८ फेब्रुवारीला उतरवण्यात नासाच्या टीमला यश आलं. त्याची सगळ्यात पहिल्यांदा जगाला माहिती स्वाती मोहन यांनी दिली. रोवरच्या मार्गदर्शन, नियंत्रणाची जबाबदारी त्यांच्यावर होती. शिवाय त्याचं लँडिंग होत असताना प्रत्येक अपडेट द्यायचं कामही त्यांनी केलं. रोवर जेझिरो विवरात उतरत असताना 'रोवर पूर्णपणे सुरक्षित असून मंगळ ग्रहावरच्या जीवसृष्टीचे पुरावे शोधण्यासाठी तयार आहे.' अशी घोषणा डॉ. स्वाती मोहन यांनी केली. आणि एकच जल्लोष झाला. गेले ८ वर्ष त्या या प्रोजेक्टवर काम करतायंत. हा प्रोजेक्ट २०१३ ला सुरू झाला. या सगळ्या प्रक्रियेचा भाग बनणं त्यांच्यासाठी मोठी गोष्ट होती. फ्लोरिडा टुडेला दिलेल्या मुलाखतीत त्या म्हणतात, 'पर्सिवरन्ससाठी मी जितका वेळ दिलाय तितका वेळ मी शाळेतही गेली नाहीय. माझ्या छोट्या मुलीच्या वयापेक्षा अधिक वेळ मी पर्सिवरन्सला दिला. हा माझ्या आयुष्याचा मोठा भाग बनलाय.' यशस्वी मोहिमेऐवजी अयशस्वी प्रयत्नातून आपण जास्त शिकत जातो, असं बीबीसीशी बोलताना त्यांनी जगापर्यत संदेश पोचवलाय. भारताशी असलेलं त्यांचं नातंही अतूट आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये आपण भारतात येत असल्याची आठवणही त्या सांगतात. अनेक रिसर्च पेपर त्यांच्या नावावर आहेत.

जगाच्या नजरा नासाच्या मार्स रोवर पर्सिवरन्सकडे लागल्या होत्या. कारण मंगळावरच्या जीवसृष्टीच्या अस्तित्वाचा शोध घेणारी नासाची महत्वाकांक्षी मोहिम होती. जुलै महिन्यात हा रोवर अवकाशात झेपावला. मागच्या सात महिन्यात या रोवरनं ४७२ मिलियन किलोमीटर म्हणजेच ४७.२ कोटी किलोमीटर इतकं अंतर पार केलंय. १९ हजार किलोमीटर ताशी वेगानं हा रोवर अपेक्षित स्थळापर्यत पोचलाय. आजपर्यतचा हा सगळ्यात मोठा आणि विकसित रोवर आहे. रोवरचं लँडिंग होणं ही सगळ्यात अवघड गोष्ट असते. कारण आजपर्यत केवळ अर्धीच मिशन मंगळावर पोचण्यात यशस्वी झालीत. त्यामुळे रोवर पर्सिवरन्सचं यशस्वी लँडिंग होणं ही खूप आशादायी गोष्ट होती. डॉ. स्वाती मोहन यांचं टीम वर्क यशस्वी झालं. पुढची काही वर्ष हा रोवर मंगळावरचे दगड, मातीचे नमुने गोळा करेल. २०३० पर्यत हे नमुने नासाच्या प्रयोगशाळेत तपासले जातील. या जगात केवळ आपण एकटेच आहोत का या प्रश्नाचं उत्तर शोधायचा हा प्रयत्न असल्याचं नासाचे असोसिएट ऍडमिनिस्ट्रेटर थॉमस त्सुरबुखेन म्हणतात. रोवरची अनेक वैशिष्ट्य आहेत. यात १९ कॅमेरे आहेत. एका कॅमेऱ्यानं नासाला मंगळावरच्या प्राचीन तलावाचे फोटोही पाठवलेत. यात एक छोटासा हेलिकॉप्टर ड्रोनही बसवण्यात आलाय. मंगळ ग्रहावर हेलिकॉप्टर उडवायची ही योजना ऐतिहासिक आहे. हे पहिल्यांदाच घडतंय. रोवरमधे एक असंही यंत्र बसवण्यात आलंय जे मंगळावर अस्तित्वात असलेल्या सध्याच्या कार्बन डायॉक्साईडला ऑक्सिजनमधे बदलू शकतं. भविष्यात मंगळावर मानवी वस्ती उभी राहिली तर ऑक्सिजनची गरजही पूर्ण होईल अशी ही योजना आहे. रोवरला जोडलेल्या मायक्रोफोनद्वारे तिथला आवाज रेकॉर्ड केला जाईल. आजपर्यत ४ रोवर मंगळावर उतरवले गेलेत. पण त्यातल्या तंत्रज्ञानाचं स्वरूप मर्यादित राहिलंय. आताच रोवर पर्सिवरन्स मात्र इतरांपेक्षा वेगळा आहे.

# 'बहुजन हिताय'चे तीन तेरा

**कोरोना काळात विद्यार्थ्यांच्या शिकण्यात अडथळा येऊ नये म्हणून राज्य सरकारनं शाळा बंद, पण शिक्षण सुरु' ही ऑनलाईन अभ्यासमाला सुरू केली होती. पण ऑनलाईन शिक्षणात ले अडथळे सगळ्यांनाच माहितीयत. इथल्या शाळा बंद झाल्या की, कुणी काहीही केलं की शिकण्याची प्रक्रिया आपोआपच बंद होते. कारण मुलांसाठी वर्गाबाहेर काहीतरी शिकण्याच्या संधी निर्माण करणारी व्यवस्थाच आपल्याकडे नाही.**

देशभरातली शाळा, कॉलेजं मागचं संपूर्ण वर्ष पूर्ण बंद होती. असंख्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचं खूप नुकसान झालं. काही राज्यांनी शाळांचे दरवाजे पुन्हा उघडायला हळूहळू सुरवात केलीय. महाराष्ट्रातही काही ठिकाणी शाळा सुरू करण्यात आल्या होत्या. पण कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे पुन्हा एकदा त्या बंद करण्याची राज्य सरकारवर वेळ आलीय. विद्यार्थ्यांच्या शिकण्यात खंड पडू नये म्हणून राज्य सरकारच्या वतीने शाळा बंद, पण शिक्षण सुरु' नावाची ऑनलाईन अभ्यासमाला यापूर्वीच सुरू केलीय. पण ऑनलाईन शिक्षणातले अडथळे सगळ्यांनाच माहितीयत. तसं पाहिलं तर इथल्या शाळा बंद असल्या की शिकण्याची प्रक्रिया आपोआपच बंद होते. कारण मुलांसाठी वर्गाच्या बाहेर काहीतरी शिकण्याच्या संधी निर्माण करणारी व्यवस्थाच अस्तित्वात नाही. जी व्यवस्था अस्तित्वात आहे ती शाळेच्या पुस्तकांभोवतीच चाकोरीबद्ध पद्धतीने फिरत असते.

पुस्तकी ज्ञानाचं गोचीड

शाळेच्या बाहेरही बऱ्याच गोष्टी शिकता येतात हा विचार आजच्या शिक्षणव्यवस्थेतून नाहीसा झालाय. त्यामुळे फक्त चार भिंतीच्या आत मिळणारं आणि घोकंपट्टीवर आधारलेलं पुस्तकी प्रवचन म्हणजे शिक्षण असा चुकीचा समज भारतीय जनमानसाला आजही गोचडासारखी चिकटून आहे. अशा पुस्तकी ज्ञानाचा व्यावहारिक जीवनाशी काडीमात्रही संबंध नसतो. तरीपण भारतीय शिक्षणव्यवस्थेत पुस्तकांनी आपलं पवित्र स्थान टिकवून ठेवलंय. शाळेचं पुस्तक हे अशी एक आस आहे की, ज्याभोवती वर्ग-खोल्यांमधलं शिक्षण फिरत असतं. कदाचित त्यामुळेच शिकण्याच्या आणि शिकवण्याच्या प्रक्रियेत क्रिएटिविटीचा अभाव पाहायला मिळतो.

ऑनलाईन शिक्षणाचा फुसका बार

शाळेच्या पुस्तकांची भूमिका एवढ्यावरच थांबत नाही तर त्यांच्या आजवरच्या आकृतींचा अभ्यास केला तर दिसून येतं की ही पुस्तकं बहुतांश पितृसत्ताक, शहरी मध्यम जात-वर्गीय आकृतिबंधातच रेखाटली गेलीयत. ज्येष्ठ शिक्षणतज्ञ कृष्णकुमार यांच्या मते, वर्गावर्गात होणाऱ्या शिक्षणावर राज्य सरकारांना नियंत्रण ठेवता यावं यासाठीचं एकमात्र साधन म्हणजे पाठ्यपुस्तक! शाळेची पुस्तकं ही खऱ्या अर्थानं समाज आणि व्यक्तीसाठी दिशादर्शक असायला हवीत. गेल्या वर्षभरात असंख्य विद्यार्थ्यांनी शाळांचं साधं तोंडही पाहिलं नाही. त्यामुळे शिकण्याची आणि शिकवण्याची प्रक्रिया आपोआपच बंद पडली. यावर उपाय म्हणून ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय समोर आला खरा. पण तोही फुसका बार निघाला. ऑनलाईन शिक्षण घेता येत नाही म्हणून बऱ्याच मुलांनी आत्महत्या केल्याचं यापूर्वीच समोर आलंय. आपल्या देशातले सत्ताधारी संसदेत प्रवेश करण्यापूर्वी नतमस्तक होतात. पण यावर संसदेत कधीच आवाज उठवत नाही. याउलट नवीन शैक्षणिक धोरण गेम चेंजर आहे आणि देशाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी नक्कीच हातभार लावेल अशा वल्गना करून स्वतःची पाठ स्वतःच थोपटतात.

मुलांनी गमावलं भाषा आणि गणित

कोरोनामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे तीन तेरा आणि नऊ अठरा झाले. यामुळे मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेवर



दूरगामी परिणाम झाले. याबाबत बंगळूरूमधल्या अझीम प्रेमजी युनिवर्सिटीने कोविडमुळे झालेला शिक्षणाचं नुकसान' या नावाने काही दिवसांपूर्वीच एक रिपोर्ट प्रकाशित केलाय. या रिपोर्टमधे छत्तीसगड, कर्नाटक, मध्यप्रदेश, राजस्थान आणि

**शिक्षणनामा**

**विनायक काळे**

उत्तराखंड अशा पाच राज्यातल्या विद्यार्थ्यांचं सर्वेक्षण करण्यात आलं. मागच्या एका वर्षात शिकण्या, शिकवण्याची प्रक्रिया बंद असल्याने मुलांची कमीत कमी एक भाषा आणि गणित विषयातली पायाभूत क्षमता गमावल्याचं या अहवालात अधोरेखित केलंय. आतापर्यत या अहवालावर कुठंही चर्चा घडून आल्याचं दिसलं नाही. संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन नुकतंच पार पडलं. यावेळी प्रस्थापित सत्ताधाऱ्यांनी त्यांच्या कामाचा लेखाजोखा मांडला. पण कोरोनाकाळात झालेल्या शिकण्याच्या नुकसानीबद्दल कुणीही साधा ब्र उच्चारला नाही.

नवं शैक्षणिक धोरण पुरेसं आहे?

शिक्षण हा भौतिक विकासाचा पाया मानला जातो. पण गेल्या वर्षीपासून या भौतिक विकासाच्या साधनापासून खूप मोठा समाज परिघाच्या बाहेर राहिलाय. आपल्या देशातली शैक्षणिक परिस्थिती अजूनही म्हणावी तशी निवळली नाही. त्यातही आपली राज्यव्यवस्था विद्यार्थ्यांना शाळेच्या बाहेर शिकण्याच्या संधी उपलब्ध करून देण्यात कुचकामी बनलीय. आजघडीला खऱ्या अर्थाने विद्यार्थीकेंद्रित नाविन्यपूर्ण शिकण्या, शिकवण्याची नितांत गरज आहे. केंद्रातल्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाच्या विद्यमान सचिवांनी द इंडियन एक्सप्रेस' या इंग्रजी पेपरमधे शिकण्याची मजा' या शीर्षकाखाली एक लेख लिहिलाय. नवीन शैक्षणिक धोरण २०२० हे विद्यार्थीकेंद्रित अध्यापन शास्त्रावर भर देतं असा त्यांनी संबंधित लेखात विश्वास व्यक्त केलाय. पण मागच्या वर्षभरापासून शाळेचं तोंडही न पाहिलेल्या विद्यार्थ्यांना इथुन पुढं मुख्य प्रवाहात कसं आणता येईल यासाठी कोणतीही तरतूद त्यात सापडत नाही. शिवाय, त्यांचं झालेलं नुकसान भरून निघेल असाही विचार या धोरणात कुठेच आढळत नाही.

अनुभव हेच खरं ज्ञान

भारतातल्या काही राज्यांमधे पारंपारिक शिकण्या, शिकवण्याच्या पद्धतीला पर्याय म्हणून कृतीयुक्त शिक्षण पद्धती म्हणजेच 'ऍक्टिविटी बेस्ड लर्निंग' आणि ज्ञानरचानावाद' यासारखे प्रयोग करण्यात आले होते. अशा शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देऊन शिकवण्याचा प्रयत्न केला जातो. पण असले उपक्रम शाळेच्या चार भिंतीपुरतेच मर्यादित राहतात. ज्ञानाचा एकमात्र स्त्रोत हा अनुभव आहे असं जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांनी म्हटलं होतं. सध्याच्या शिक्षणव्यवस्था मुलांना आसपासच्या वातावरणाशी जोडण्यात कमी पडत आहे. तसं झालं असतं तर आज मुलं शिक्षणासाठी हतबल झाली आहेत, तशी झाली नसती.

बहुजन हिताय'चे तीन तेरा

त्याकाळची शिक्षणव्यवस्था बँकिंग मॉडेलवर आधारित आहे असं पॉलो फ्रीअरे यांनी दाखवून दिलं होतं. आजही यामधे काहीच फरक पडलेला दिसत नाही. आपल्या देशापुरता विचार केला तर आपल्याकडचे शैक्षणिक मॉडेल बँकिंग तर आहेच. पण भांडवलदार, विशिष्ट वर्गाच्या हिताचा विचार करणारं बनलंय. त्यामधे बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हा विचार नावालासुद्धा दिसत नाही. पुढील काही दिवसांत राज्यात विधानसभा अधिवेशन होईलच. त्यामधे शिक्षणाच्या मुद्द्याला प्राथमिकता दिली जाते की नाही आणि राज्यातल्या शिक्षणाची विस्कटलेली घडी बसवण्यासाठी अधिवेशनात काही ठोस पावलं उचलली जातात की नाही हे येणारा काळचं सांगेल. पण अशा वैधानिक कृती कार्यक्रमाची आखणी करून असंख्य विद्यार्थ्यांचं झालेलं नुकसान भरून काढणं खूप गरजेचं आहे.

# 'विजयासाठी कधीच नव्हती कविता'

## एक दिवस मराठीमध्ये काव्य वैभव बहरले

▶ प्रतिनिधी

माजलगाव : सरस्वतीच्या मंदिरामधील, मोजक्याच दैदिप्यमान रत्नापैकी एक असलेले व साहित्य क्षेत्रात ४ ते ५ दशकापेक्षा जास्त प्रभाव गाजवणारे साहित्यिक कविवर्य कुसुमाग्रज यांच्या काव्यवैभवाची मैफल मराठवाडा साहित्य परिषद माजलगाव शाखेच्या २३३व्या एक दिवस मराठी या कार्यक्रमात चांगलीच बहरली प्रमुख व्याख्याते प्रा.डॉ रमेश गटकळ यांच्या सुमधुर वाणीतुन कुसुमाग्रजांच्या काव्याची हळुवारपणे उकल होत गेली यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.स्नेहल पाठक तर मुकुंदराज सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आपल्या व्याख्यानात बोलताना डॉ.गटकळ म्हणाले की, साहित्य क्षेत्रामध्ये चौफेर वावर असलेले वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज हे लोकमान्य असलेल्या जीवनलहरी, विशाखा, मराठीमाती, समिधा, वादळवेल, किनारा, अक्षर वाघ, मेघदूत अशा अनेक काव्यसंग्रहाचे धनी होते.

'विजयासाठी कधीच
नव्हती कविता माझी,
म्हणून नव्हती भीती
तिजला पराजयाची,
जगण्यासाठी हटून केव्हाच नव्हती माझी कविता, म्हणून तिला खंतही नव्हती मरण्याची'

अशा सहज साध्या शब्दातील कुसुमाग्रजांच्या कविता काव्यक्षेत्रात प्रभाव पाडून जातात असे सांगताना डॉ.गटकळ यांनी कुसुमाग्रजांच्या कणा या गाजलेल्या कवितेचा संदर्भ घेतला नाउमेद झालेल्या माणसा करिता शब्द आधार देत असतात.असे सांगताना कवितेतून प्रेरणा घेत माणसाच्या मनात स्वाभिमानाचा अंश जागृत करणारी कुसुमाग्रजांची मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा, पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा. ही काव्य रचना जगण्याची उमेद देऊन जाते असे मत व्यक्त केले.प्रेमा बाबतीत कुसुमाग्रजांनी जी मांडणी केली त्या मांडणीला तोड नाही असे सांगताना,

'प्रेम कुणावर करावं, तर कुणावरही करावं

प्रेम राधेच्या वत्सल असलेल्या वातसल्यावर करावं'



जीवनात सगळ्याच गोष्टी आपल्या मनासारख्या होणार नाहीत.ज्या प्राप्त झाल्या त्या सर्वच गोष्टी वर प्रेम करावं.प्रेम ज्याला तारायचं त्याच्यावर करावं, पण ज्याला मारायचं त्याच्यावरही करावं, असा संदेश कुसुमाग्रजांनी आपल्या कवितेतून दिला. प्रेमाच्या बाबतीत वेगवेगळे संदर्भ देणाऱ्या कुसुमाग्रजांच्या कवितेतील प्रेम म्हणजे काय? या काव्य रचनेतील

जागा हो जाण्यापूर्वीच वेळ,
कारण प्रेम नाही
भातुकलीचा खेळ.
प्रेम म्हणजे वणवा होऊन
जळत रहाणं
आणि प्रेम म्हणजे जंगल
होऊन जळत राहणं.

या ओळीतून संदेश देताना प्रेमात जशी वेळ येईल तसे राहावं लागतं असे कुसुमाग्रज सांगतात.

तर जोगिन या कवितेच्या माध्यमातून स्त्री मनाची सुलभ भावना आपल्या कवितेतून व्यक्त करताना

साद घालशील तेव्हाच येईल,
जितकं मागशील तितकच देईल,
दिल्यानंतर देहा वेगळ्या सावली
-सारखी निघून जाईल.

मनाच्या खोल कप्प्यात साद घालणारी जोगिन ही कविता स्त्री मनाचा सुलभ अविष्कार असून, ही कविता मनाला हुरहूर लावतेअसेही डॉ.गटकळ यांनी सांगितले. अनेक दशके साहित्य क्षेत्रामध्ये चौफेर वावरताना कुसुमाग्रजांनी त्यांच्या नाट्य प्रतिभाचे अनेक चहाते निर्माण केले होते. दिवाणी दावा, हेमा चे घर, किमायागार, ययाती, देवयानी व नाट्य प्रतिभेचा आविष्कार असलेले नटसम्राट ही नाटके आजही समाजावर प्रभाव पाडतात.कुसुमाग्रजांचे कथा क्षेत्रात एकाकी तारा, काही वृद्ध काही तरुण, प्रेम आणि मांजर, फुलवाती, सतारीचे बोल, बालकुमारांसाठी चे साहित्य समाजमनावर व बालमनावर छाप पाडून जात असल्याचे गटकळ यांनी सांगितले.

आपल्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना प्रा स्नेहल पाठक यांनी वि वा शिरवाडकर यांच्या साहित्याची ओळख ही समाजभान, मानवतावादी प्रेम, समाजनिष्ठ, त्यांची आत्मनिष्ठा, प्रेम याचा उल्लेख व सार असल्याचे सांगितले. कुसुमाग्रजांनी आपल्या मृत्युपत्रात घरातील सेवकांचा जसे की शांताबाई, नामदेव, दत्तक घेतलेली मुलगी यांचा उल्लेख करत व दखल घेत मानवतेचा विचार कृतीत आणला. म्हणूनच त्यांच्या कवितेमधूनही ही मानवता उतरल्याचे स्पष्ट जाणवत असल्याचे सांगितले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालासाहेब झोडगे यांनी केले तर आभार प्राध्यापक यांनी व्यक्त केले. याप्रसंगी प्रा.डॉ.भाऊसाहेब राठोड, प्रेमाताई कुलकर्णी, प्रा.डॉ.विकास जाधव यांच्यासह साहित्यप्रेमी उपस्थित होते.



## वारकरी प्रबोधन सेवा मंडळाची बीड जिल्हा कार्यकारिणी घोषित

▶ प्रतिनिधी

बीड : वारकरी प्रबोधन सेवा मंडळाचे अध्यक्ष ह.भ.प.रमेश महाराज वाघ यांनी सोमवारी सायंकाळी बीड जिल्हा कार्यकारिणी जाहीर केली. जिल्हाध्यक्षपदी ह.भ.प. कालिदास महाराज नाईकनवरे यांची निवड करण्यात आली.

वारकरी प्रबोधन सेवा मंडळाची बीड जिल्हा कार्यकारिणी पुढील प्रमाणे, उपाध्यक्ष- ह.भ.प. महारूद्र महाराज पवार, सचिव- ह.भ.प.मोहन महाराज सावंत, प्रवक्ते- ह.भ.प. परमेश्वर महाराज मोरे, कार्याध्यक्ष- ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज लांब, सल्लागार- ह.भ.प. दत्तात्रय महाराज गिरी आदींनी निवड करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

**माजलगाव तालुकाध्यक्षपदी ह.भ.प.परमेश्वर महाराज सोजे**

वारकरी प्रबोधन सेवा मंडळाच्या माजलगाव तालुकाध्यक्ष ह.भ.प. परमेश्वर महाराज सोजे यांची निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे उपाध्यक्ष - ह.भ.प.गोपाळ महाराज नरके, सचिव - विजय महाराज बादाडे, कार्याध्यक्ष - ह.भ.प. धर्मराज महाराज सोळंके, प्रचारप्रमुख - भगीरथ तोडकरी, संपर्कप्रमुख - उध्दवराव ताकट, सहसचिव ज्ञानेश्वर जाधव, सरचिटणीस - ह.भ.प. अंगद महाराज डाके, सहसरचिटणीस - ह.भ.प.विष्णु महाराज बादाडे, प्रवक्ते - ह.भ.प. उध्दव महाराज ठोंबरे, सल्लागार ॲड.सुरेशराव सोळंके, संघटक - ह.भ.प. माऊली महाराज जगताप, खजिनदार दत्ता डाके, आंदोलनप्रमुख माऊली महाराज जाधव आदी कार्यकारिणी घोषित करून नियुक्तीपत्र देण्यात आली.

## संजय गांधी, श्रावणबाळ योजनेचे मानधन दरमहा ₹५००० हवे : उपेक्षित समाज संघटना

▶ प्रतिनिधी

माजलगाव : संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना तसेच केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दरमहा मिळणाऱ्या वेतन अनुदानात वाढ करून ते ५ हजार रुपये इतके करावे, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे तहसीलदारांमार्फत उपेक्षित समाज संघटनेच्या वतीने शुक्रवारी करण्यात आली.



शासनाच्या वतीने अर्थसहाय्य देण्याच्या हेतूने राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार योजना व वयोवृध्द व्यक्तींसाठी श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना राबविण्यात येतात. या योजनेअंतर्गत दरमहा एक हजार रुपये अनुदान देण्यात येते. परंतु गोवा राज्यामध्ये अपंग व निराधार व्यक्तिंना २५०० रुपये दरमहा अर्थसहाय्य मिळत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही वेतन अनुदान वाढवून देण्यात यावे अन्यथा तहसील कार्यालयासमोर लाक्षणिक सत्याग्रह आंदोलन करण्यात येईल, असा इशारा उपेक्षित समाज संघटनेचे अध्यक्ष ॲड.गौतम मिसाळ, सचिव ॲड.बी.एस. नाडे यांनी तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

## आठवडी बाजार बंद; शेतकरी, गरीबांचे हाल

▶ प्रतिनिधी

माजलगाव : गेल्यावर्षी मार्च महिन्यात देशामध्ये कोरोना या महामारीने थैमान घातले होते यामुळे देशामध्ये सर्व काही बंद होते यामध्ये गोरगरीब, शेतकरी, व्यापारी यांचे शेती पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले, यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला होता.



काही दिवस कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने बाजारपेठेत शेतीचे पिके, बाजीपाला विक्री करीत होते यामुळे गोरगरीब शेतकरी, व्यापारी यांच्या चुली पेटत होत्या कसेबसे जिवन जगत होते. बीड जिल्ह्यामध्ये कोरोना या रोगाची परिस्थिती नियंत्रणात असतानाही व तसेच प्रदीर्घ लॉकडाऊन कोरोना परिस्थिती गेल्या वर्षापासून सर्व सामान्य गोरगरीब, शेतकरी, लहान, छोटे-मोठे व्यापारी अत्यंत बिकट परिस्थितीमध्ये जिवन जगण्यासाठी संघर्ष करत आहेत असुनही उद्योगधंदे, व्यवसाय व्यवस्थित सुरू झाले नाहीत, अनेक गोरगरीब सुशिक्षित बेरोजगार तरुणांनाच्या नोकर्या गेल्या आहेत. काही गोरगरीब जनतेला दोन वेळेच्या जेवणाची चिंता सुटलेली नाही, या सर्व परिस्थितीला तोंड देत तो कसाबसा जीवन जगत होता त्यांतच काल जिल्हाधिकारी साहेब यांनी आदेश काढून ग्रामीण व शहरी भागातील आठवडी बाजार बंद करण्याचे आदेश दिले व त्याची अंमलबजावणी होत असुन जिल्ह्यातील सर्व आठवडी बाजार बंद केल्याने गोरगरीब, शेतकरी, व्यापाऱ्यांनी कसे जीवन जगायचे त्यांच्या शेतातील, भाजीपाला व फळपिके बाजार बंद असल्याने मोठे नुकसान होत आहे ही नुकसान भरपाई कोण देणार, गोरगरीब, शेतकरी, व्यापारी यांच्या चुली कशा पेटणार यामुळे सर्व गोरगरीब, शेतकरी, व्यापारी यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे तरी प्रशासनाने कोरोच्या संकटात गोरगरीब, शेतकरी, व्यापारी यांना शेतातील भाजीपाला व फळपिके विक्री साठी बाजार पेठ किवा योग्य ती सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी ओबीसी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राम कटारे यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे केली आहे.

# मुक्ता



## 'महिलादिन' का साजरा केला जातो?

हसून प्रत्येक वेदना विसरणारी,
नात्यामध्ये तिची बंदिस्त दुनिया सारी,
प्रत्येक वाट प्रकाशमान करणारी,
ती शक्ती आहे एक नारी...!

जगभरात दरवर्षी ८ मार्चला 'जागतिक महिला दिन' साजरा केला जातो. आज असे एकही क्षेत्र नाही, ज्यामध्ये महिलांनी आपली छाप पाडलेली नाही. महिलांच्या हक्कांचे रक्षण, स्त्री सन्मानतेच्या दृष्टीने जागतिक महिला दिन साजरा केला जातो. महिलांच्या हक्कांचे रक्षण आणि स्त्री-पुरुष समानता या दृष्टीने जागतिक महिला दिनाला विशेष महत्त्व प्राप्त आहे. सण १९०९ पर्यत महिला दिन २८ फेब्रुवारीला साजरा केला जात असे. आंतरराष्ट्रीय महिला वस्त्रे निर्मिती कामगार संघटनेने पुकारलेल्या संपाच्या पार्श्वभूमीवर या दिवशी महिला दिन साजरा केला होता. ऑगस्ट १९१० मध्ये आंतरराष्ट्रीय महिला परिषदेचे कोपनहेगन येथे आयोजन केले होते. याच परिषदेत जगभरात एक दिवस जागतिक महिला दिन साजरा केला जायला हवा, असे ठरविले होते. मात्र तो दिवस त्यावेळी निश्चित केला नव्हता. त्यानंतर १९१४ मध्ये प्रथमच ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला.

त्यादिवशी रविवार असल्यामुळे हा दिवस निवडला होता. त्यानंतर ८ मार्चला जगभरात महिला दिन साजरा करण्याचा प्रघात पडला. महिला दिन हा कोणत्याही संघटनेचा म्हणून ओळखला जात नाही. जगभरातील वेगवेगळ्या देशांतील सरकारांकडून महिला दिन साजरा केला जातो. यानिमित्त वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजनही केले जाते. महिलांना प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने काही मार्गदर्शक तत्त्वे, कार्यक्रम निश्चित केले आहेत.

**जांभळ्या रंगाचे महत्व**

जांभळ्या रंगामागे इतिहास आहे. लिंग समानता म्हणजेच जेंडर इक्वालिटी चे प्रतिक म्हणून या रंगाकडे पाहिले जाते. जांभळा रंग हा 'महिला मुक्तता आंदोलन' यांचे देखील प्रतिक आहे. स्त्रियांनी इतिहासात दिलेल्या त्यांच्या अधिकार आणि हक्काच्या लढ्यांमध्ये हाच जांभळा रंग प्रतिकात्मकतेने वापरला होता.

### जागतिक महिला दिनाचे स्वरूप

अनेक देशांमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनी सरकारी सुट्टी असते. रशिया आणि इतर काही देशांमध्ये या दिवसाच्या आसपास फुलांचे दर वाढतात. आंतरराष्ट्रीय महिला दिनाला स्त्री-पुरुष एकमेकांना फुले देतात. चीनमध्ये अनेक कार्यालयांमध्ये महिलांना हाफ डे म्हणजे अर्ध्या दिवसाची रजा मिळते. अमेरिकेत संपूर्ण मार्च महिना 'वुमन्स हिस्ट्री मंथ' म्हणून साजरा करतात.

पान ४ वरुन

**'जमाना बदल गया है बॉस'**

वाढत गेली, तसंतसं याबाबतीतले गुन्हेही वाढू लागले. स्त्रियांविरूद्ध केले जाणारे सायबर गुन्हे वाढले. आपल्या मतांशी एखादी स्त्री सहमत नसेल तर तिला ट्रोल करणं, तिचं चारित्र्यहनन करणं तर आता नेहमीचंच झालं आहे पण त्याहीपुढे प्रेमात एखाद्या स्त्रीनं नकार दिला, तर तिचा फोन नंबर सार्वजनिक करणं, तिचे फोटो हवे तसे एडीट करून पसरवणं, अगदी खासगी क्षणांचे फोटो, वीडियो सार्वजनिक करणं, तसंच सोशल मीडियावर किंवा अगदी मॅट्रिमोनियल साईट्सवरच्या फोटोंचाही गैरवापर, आर्थिक फसवणूक असे गुन्हे दररोज केले जातात.

या सगळ्या गुन्ह्यांची दरवर्षी किती प्रमाणात नोंद होते, याची आकडेवारी नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या वेबसाईटवर महिलांविरुद्ध केले केलेले सायबर गुन्हे' या विभागात मिळते, मात्र त्यातही लैंगिक अत्याचाराचे गुन्हे किती, आर्थिक फसवणुकीचे किती, महिलांच्या प्रायवसीचा भंग करणारे गुन्हे किती? अशी वर्गवारीनुसार नोंद मात्र नाही. अश्या गुन्ह्यांची नोंद होत नाही, तोपर्यंत या सगळ्यावर उपाययोजना म्हणून काय धोरणं आखावीत, यासाठी डेटाच उपलब्ध होत नाही, हा एक धोरणदृष्ट्या मोठाच अडसर आहे.

तंत्रज्ञानाची डिजीटल डिवाईड संकल्पना

दुसरा महत्वाचा मुद्दा आहे तो, सर्वच महिलांना तंत्रज्ञानाची उपलब्धता आहे का? हा. राज्यातल्या, देशातल्या ग्रामीण भागातल्या, दुर्गम भागातल्या लाखो महिलांकडे साधा मोबाईलसुद्धा उपलब्ध नाही, कम्प्युटरआणि इतर साधनं तर दूरची गोष्ट. बऱ्याच जणींकडे मोबाईल असलेच तर रेंजच नसते, एखादा फोन करायचा झाला तरी दूर कुठेतरी टेकडीवर जावं लागतं. अशा स्थितीत या महिला तर संपर्क, संवाद, माहिती, शिक्षण यापासून दूरच राहतात. पुणे जिल्ह्यातल्या जुन्नरजवळच्या आदिवासीबहुल भागातील अनेक गरीब आदिवासी मुलींना साधा एमएससी आयटीकोर्स करणंही परवडत नसल्यानं, अनिल साबळे सामाजिक कार्यकर्त्या कवीनं त्यांच्यासाठी आर्थिक मदत उभारून त्यांना या कोर्सचं शिक्षण देण्याचा विडाच उचलला आहे.

या मुलींच्या शिक्षणावरच्या रिपोर्टिंगसाठी मी या भागात फिरले होते, तेव्हा त्यांच्याशी संवाद करताना हे लक्षात आलं की, कॉम्प्यूटर शिकण, तो पाहणं, दररोज हाताळायला मिळणं, घरात कॉम्प्यूटर, लॅपटॉप असणं हे या मुलींना केवढं मोठं स्वप्नं वाटतं. सर्वसामान्य स्त्रियांसाठी हे अगदी सहज उपलब्ध असलं तरी या मुलींसाठी मात्र कॉम्प्यूटर शिकायला मिळणं ही लक्झरी' आहे. तंत्रज्ञानाच्या अशा असमान उपलब्धतेमुळे वंचित घटकातल्या लोकांच्या, स्त्रियांच्या आयुष्यावर काय परिणाम होतो, याचा अभ्यास अलीकडे डिजीटल डिवाईड' या संकल्पनेखाली केला जातो.

माध्यमं स्त्रियांची प्रतिमा बनवतात

तंत्रज्ञानामुळे महिलांचं आयुष्य जसं सोपं झालं आहे, तसंच ते इथल्या बाजारप्रणित व्यवस्थेमुळे तितकंच गुंतागुंतीचंही झालं आहे. कसं ते समजून घेण्यासाठी मिया खलिफा या पॉर्न स्टारचं उदाहरण बोलकं आहे. मिया खलिफा अमेरिकेतील एक पॉर्नस्टार होती, नंतर तिने ते काम सोडून दिलं आणि स्पोर्ट्स कमेंटेटर म्हणून काम करू लागली. पण आजही लोक तिच्याकडे पॉर्न स्टार म्हणून बघतात. का? ज्या पॉर्न वेबसाईटशी तिनं करार केले होते, त्यांनी तिचे वीडियो त्या वेबसाईटवरून काढून टाकण्यासाठी नकार दिला. इतकंच नाही, तर युट्यूबवर अजूनही तिचे एक दोन पॉर्न वीडियो आहेत. बीबीसीला दिलेल्या मुलाखतीत तिनं सांगितलं होतं, की तिला तिचा भूतकाळ विसरून आयुष्याची नव्याने सुरुवात करायची आहे, पण लोक आणि ज्या माध्यमांवर तिचे विडिओ उपलब्ध आहेत, ते तिला तिचा भूतकाळ विसरूच देत नाहीत.

युटयूब किंवा पॉर्न वेबसाईट्सच्या माध्यमांतून तिचे वीडियो जगभर पसरले नसते तर तिला नवीन आयुष्य सुरू करणं तुलनेनं सोपं गेलं असतं. याचाच अर्थ आजच्या काळातल्या तंत्रज्ञानाचा आविष्कार असलेली ही माध्यमं एखाद्या व्यक्तीची आणि विशेषत: स्त्रियांची जी प्रतिमा बनवतात, ती नंतर बदलणं किंवा पुसून टाकणं ही खूपच अवघड गोष्ट आहे. आज जरी गुगलवर मिया खलिफा सर्च केल्यावर तिच्या नावापुढे स्पोर्ट्स कमेंटेटर अशी तिची ओळख तिथे येत असली तरी विडिओ तंत्रज्ञानानं लोकांच्या मनावर तिची जी इमेज ठसवली आहे, ती पूर्णपणे पुसली जाणं जवळपास अशक्य आहे. यात बाजारु पुरुषप्रधान व्यवस्थेचा नि तशी मानसिकता बनलेल्या समाजाचाही सहभागही तेवढाच आहे. हीच मानसिकता मग कधी हातात असलेल्या व्हॉट्सअपचा वापर करून फक्त मेसेज पाठवून बाईला तलाकही देते आणि लाईव लोकेशन, वीडियो कॉल या तंत्रज्ञानाचा वापर करून आपल्या प्रेयसी, बायकोवर पाळतही ठेवते आणि एखाद्या आयेशाल मरतानाचा वीडियोही पाठव, असंही निर्दयीपणे म्हणते.

बाईचा अवकाश संपवला जातो

तंत्रज्ञानाच्या आधारे स्त्रिया आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू लागल्या, जगभर फिरू लागल्या तरी हेच तंत्रज्ञान त्यांनाच ग्राहक - बाजारपेठ म्हणूनही वापरतं आहे. फेसबुक, इंस्टाग्राम आणि इतरही माध्यमं वापरणाऱ्या सर्वच वापरकर्त्यांचा डेटा या सेवा पुरवणाऱ्या कंपन्या गोळा करत असतात आणि विविध उत्पादन कंपन्यांना देतात. २०५० ला तुम्ही कसे दिसाल?' असं एखादं पॉप अप फेसबुकवर दिसलं की, अनेकांना त्यावर क्लिक करून ते करून पाहण्याचा मोह होतो, जेव्हा त्यावर क्लिक करून त्याचा रिझल्ट तुम्ही मिळवता, तोपर्यंत तुमचा डेटा अनेक उत्पादक कंपन्यांपर्यत पोचलेला असतो. सौंदर्यप्रसाधनं, कपडे, बूट इतर स्टायशिल वस्तू, काळ्या त्वचेला गोरं करणाऱ्या क्रिम्सपासून ते वाढलेलं पोट लपवण्याचे पट्टे आणि स्तनांचा आकार मोठं करणारी तेलं आणि बाईला उपभोग्य वस्तू समजून तयार केलेली जाणारी अशी अनेक उत्पादनं तुम्हालाच विकली जातात. कळत-

नकळत या जाळ्यात बरेच जण अडकतात, विशेषत: स्त्रिया. आणि मग कृत्रिम बुद्धिमत्ता तुमचं सगळं वर्तन अगदी भावनाही हळूहळू नियंत्रित करू लागते. स्त्रियांचा खासगी अवकाश तर संपतोच पण त्याचबरोबर त्यांच्या डेटाचा, फोटोंचा कसा वापर-गैरवापर केला जाईल, हे कुणीही सांगू शकत नाही नि त्यावर नियंत्रण ठेवणंही गुंतागुंतीचं होऊन जातं.

शिक्षणक्षेत्रातल्या महिलांचा टक्का

हे असं सगळं का घडतं? तर तंत्रज्ञानाशी संबंधित संशोधन आणि धोरणनिर्मिती यात लिंगभावाच्या अंगाने विचार करणाऱ्या स्त्री-पुरुषांचा असलेला अभाव. म्हणजे आपल्याकडे विज्ञान, गणितात पैकीच्या पैकी गुण मिळवणाऱ्या, पुढे जाऊन विज्ञान-तंत्रज्ञान शिकणाऱ्या स्त्रिया खूप आहेत. शिकल्यानंतर त्या शिक्षणाचा प्रत्यक्ष वापर करत संशोधन करणं, धोरण बनवणं किंवा अगदी हे विषय शिकवणं - यातल्या स्त्रियांचा सहभाग आहे जवळपास २१ टक्के. म्हणजेच विज्ञान-तंत्रज्ञानात उच्चशिक्षण घेतलेल्या शंभरपैकी २१ महिलाच पुढे एकतर शिक्षणक्षेत्रात जातात, किंवा संशोधन, नोकरी करतात. पत्रकार रितीका चोप्रा यांनी याबद्दल केलेल्या रिसर्च पेपरवर आधारित ही आकडेवारी आहे. तेव्हा या क्षेत्रांत प्रत्यक्ष काम करणाऱ्या महिलांची संख्या इतकी कमी असेल, तर महिलांच्या दृष्टीकोनाने तंत्रज्ञान विकसित होणार तरी कसं? या प्रश्नावर विचार केला तरी या लेखाचं इप्सित साध्य होईल.

साभार : कोलाज.इन

## तिचा लढाच आहे मुळी इतरांहून वेगळा....

आतल्या हळवेपणावर
तिने आता चढवले आहे
एक भरभक्कम चिलखत,
मनात नसेल तेव्हा
अतिपरिचित स्नेह्यांनाही
ती नाही देत प्रतिसाद, नाही ओळखत.

तिच्यासमोर अनेक प्रश्नचिन्हे
डोळे वटारुन बघणाऱ्या समस्या
ज्यांच्याशी करायचा आहे तिचा तिलाच मुकाबला,
आता कुठे तडजोड नाही
लाचार माघार नाहीच नाही
तिचा लढाच आहे मुळी इतरांहून वेगळा.

तसे वृक्ष अजूनही बहरतात
फुलांनी गच्च डवरतात
हृदयतळातून फुटतात अंकुर, झुलतात पाने,
एका अज्ञात आकाशात
शुभ्र शुभ्र भरारी घेतात
गाताताही पाखरे तिच्या आवडीचे एकुलते गाणे.

आतले विश्व समृद्ध संपन्न
जपत कराराने मनोमन
बाहेर मात्र ती रूक्ष, कोरडी, नि:स्तब्ध,
प्रचंड कल्लोळ प्राणांत सावरीत
डोळ्यातले पाणी प्रयासाने आवरीत
ओठांवरची मौनमुद्रा उकलून ती बोलते मोजका शब्द

**: शांता शेळके**

# ‘जमाना बदल गया है बॉस’



**तंत्रज्ञानामुळे महिलांचं आयुष्य जसं सोपं झालंय, तसंच ते इथल्या बाजारप्रणित व्यवस्थेमुळे तितकंच गुंतागुंतीचंही झालं आहे. हीच मानसिकता व्हॉट्सअपचा वापर करून, मेसेज पाठवून बाईला थेट तलाक देते. लाईव लोकेशन, वीडियो कॉलचा वापर करून आपल्या प्रेयसी, बायकोवर पाळतही ठेवते आणि एखाद्या आयेशाला मरतानाचा वीडियो पाठव, असंही निर्दयीपणे म्हणते.**

## ‘ती’चे विश्व

**प्रियांका तुपे**

मागच्या महिन्यात मी मैत्रिणीला भेटायला तिच्या कम्प्युटर क्लासमधे गेले होते. त्यादिवशी तिथं खूप गर्दी होती. तीस–चाळीस बायका, दहा–वीस कॉलेजला जाणाऱ्या मुली आणि वीस – पंचवीस पुरुषही होते. ती गर्दी एमएससी आयटी या कम्प्युटर कोर्सच्या परीक्षेसाठी जमलेली होती. त्यातली स्त्रियांची संख्या बघून मला आनंद झाला. बरं यातल्या बऱ्याच जणी साध्या गृहिणी होत्या. अनेकांना आपल्या कामाच्या ठिकाणी कम्प्युटर नीट हाताळता यावा म्हणून किंवा सरकारी नोकरीच्या ठिकाणी नियम म्हणून या कोर्सची गरज असते, पण यातलं काहीही कारण नसतानाही आपल्याला कम्प्युटर नीट हाताळता आला पाहिजे, प्रसंगी मुलांना शिकवता आलं पाहिजे असं वाटणाऱ्या बायकांची संख्याही नजरेत भरेल इतकी होती.

खरं तर कोणतंही नवीन तंत्रज्ञान शिकण्यासाठी, समजून घेण्यासाठी बायका उत्सुक असतात, पण बरेचदा त्यांना त्यासाठी प्रोत्साहन आणि पूरक वातावरण मिळत नाही, त्यामुळे त्या नवं तंत्रज्ञान समजून घेण्यात काहीशा मागे राहतात आणि मग त्यांच्या अडाणी’ असण्यावर जोक्स बनवून ते व्हॉट्सअपवर फॉरवर्ड केले जातात. क्रिकेट, राजकारण, तंत्रज्ञान म्हणलं की, हँ..तुला काय कळणार त्यातलं?’ असा कुत्सित प्रश्न अनेक बाप, भाऊ, नवरे, मित्र आपल्या मुली, बहिणी, बायका, मैत्रिणींना अजूनही विचारतात, पण जमाना बदल गया है, बॉस!

तंत्रज्ञान आत्मसात करणाऱ्या बाया

माझ्या एका मैत्रिणीच्या बहिणीला बघायला काही दिवसांपुर्वी एक स्थळ आलं होतं. मुलाकडच्या लोकांनी विचारलं, हिला काय काय येतं? तसं मुलीचे वडील म्हणाले, ’आमच्या थोरलीचं लग्न झाल्यापासून आमचं सगळं हीच बघते. सगळं येतं. काय येत नाही ते विचारा. घरातल्या लाईट्स, टीवी दुरुस्त करण्यापासून सगळं करते आणि तिला हे इतकं आवडतं, की शेजाऱ्यांकडेही काही बिघडलं तर हिलाच बोलावतात, दुरुस्ती करायला.’

त्यावर त्या बघायला आलेल्या कुटूंबाचे चेहऱ्यांवरचे हावभाव असे काही झाले, की आम्हाला एक गृहकृत्यदक्ष सून हवी आहे, इलेक्ट्रिशियन नको’, मैत्रीण सांगत होती. तर या अशा पुरुषी वातावरणाला छेद देत अनेक जणी नवंनवं तंत्रज्ञान आत्मसात करत आपला अवकाश विस्तारत आहेत. माझ्या अनेक मैत्रिणींच्या आया ज्या आज पन्नाशी, साठीच्या पुढे गेल्यात, त्या फेसबुकवर आहेत, व्हॉट्सअप चांगलं हाताळतात, इतकंच काय नेटफ्लिक्स, अमेझॉनवर वेब सीरिजही बघतात, हे सगळं बघून त्यांनी नवीन तंत्रज्ञानाला किती आपलंसं केलं आहे, हे जाणवतं. एक मैत्रीण वृद्धांसाठी मोबाईल कसा, वापरावा याच्या कार्यशाळा घेते, तिच्या कार्यशाळेतल्या अगदी ८० – ८५ वर्षांच्या आज्याही आता परदेशातल्या आपल्या नातवंडांशी वीडियो कॉलवर बोलू लागल्या आहेत.

साध्या महिलांचे लाखो फॉलोअर्स

कोरोनाच्या काळात तर सगळं जग ठप्प झालेलं असताना, नातेवाईक, आपली माणसं विखुरलेली असताना वृद्ध महिला, एकल महिला, वेगवेगळ्या शहरांत अभ्यास–नोकरीसाठी एकट्या राहणाऱ्या तरुणींना या तंत्रज्ञानानंच हात दिला. केवळ संपर्क, संवाद एवढ्यापुरताच या तंत्रज्ञानाचा वापर होत नाही, तर आपल्या दैनंदिन जगण्यातल्या अनेक प्रश्नांची उत्तरं मिळवण्याचा प्रयत्न यातून केला जातो.

मासिक पाळीत पॅडऐवजी मेनस्ट्रुअल कप कसा वापरता येईल ते पाहण्यापासून स्वत:च्या घटस्फोटाच्या सुनावणीला वीडियो कॉन्फरन्सिगद्वारे हजर राहण्यापासून, झूम एपद्वारे काहीही शिकवणं वा शिकणं, सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या उत्पादनांची जाहिरात करणं, यु ट्यूब चॅनल चालवणं, ब्लॉगिंग करणं, ट्रॅव्हलॉग्ज, ऑनलाईन समुपदेशन करणं अशा असंख्य बाबी तंत्रज्ञानाचा वापर करून आजच्या स्त्रिया यशस्वीपणे करताना दिसतायत.

आपली आजी’, गावाकडच्या रेसिपी’ या यु ट्यूब चॅनल चालवणाऱ्या अगदी साध्या महिलांनाही आज लाखोंच्या घरात फॉलोअर्स आहेत. मोठा स्टुडिओ, मेकअप, चकचकीत वातावरण, साधनं त्यांच्याकडे नसूनही त्यांचे वीडियो हिट ठरत आहेत, ते त्यांच्या आशयातल्या साध्या मांडणीमुळे आणि हे माध्यम कसं वापरायचं याचं गमक त्यांना नेमकेपणानं कळल्यामुळे.

महिलांना संधी देणाऱ्या संस्था

एका मोठ्या न्यूज चॅनेलला अँकर म्हणून काम केलेल्या पत्रकार हर्षदा स्वकुळनेही अलीकडेच तिचं स्वत:चं युट्यूब चॅनेल सुरु केलेलं असून त्याद्वारे ती उत्तम माहिती, विश्लेषण देत असते, अल्पावधीतच तिचंही चॅनेल लोकप्रिय झालं.

ग्रामीण भागातल्या कमी शिकलेल्या किंवा अगदी अशिक्षित महिलांनाही असं काम करता यावं, यासाठी वीडियो वॉलिंटिअर्स’ ही संस्था काम करते. ग्रामीण भागातल्या दलित, आदिवासी, मुस्लीम आणि अतिशय गरीब महिलांना कॅमेरा, मोबाईल, लॅपटॉप, रेकॉर्डर अशी साधनं आणि प्रशिक्षण देऊन त्यांना त्यांच्या भागातल्या समस्यांचं रिपोर्टिंग करण्यासाठी तयार केलं जातं. या उपक्रमामुळे तंत्रज्ञानाचा त ही माहीत नसलेल्या अनेक महिला आज भारतातल्या कानाकोपऱ्यांतल्या गावखेड्यातल्या समस्या लोकांसमोर मांडत आहेत. खबर लहेरिया’ या माध्यमसंस्थेनं तर मोठाच आदर्श घालून दिलाय. खबर लहेरियामधेही अशा प्रकारे शोषित, वंचित गटातून आलेल्या आणि पत्रकारितेचं कोणतंही औपचारिक शिक्षण न घेतलेल्या महिलांना साधनं, तंत्रज्ञान आणि आशय या तिन्ही पातळ्यांवर प्रशिक्षण तसंच काम करण्याची संधी दिली जाते.

स्त्रियांविरूद्ध असेही सायबर गुन्हे

एकंदरीतच नोकरी – व्यवसाय असो की छंद जोपासणं, काही कलाकृती निर्माण करणं, अगदी मी टू’ सारख्या आपल्यावरील लैंगिक अत्याचारांना वाचा फोडण्याची चळवळ असो, स्त्रियांनी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करत आपलं आयुष्य सोपं करण्याचा, ते अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण तंत्रज्ञानाने किती जणींचं आयुष्य सुखकर झालं, हा ही एक महत्वाचा प्रश्न आहे.

आपण ज्या पुरुषप्रधान व्यवस्थेत आहोत, त्याचं प्रतिबिंब स्त्रियांच्या तंत्रज्ञान वापरातही उमटतं. समाजमाध्यमांपासून विविध तंत्रज्ञानांचा वापर करण्याची स्त्रियांची संख्या जसजशी (पान ३ वर)

## कवितेतील ती

### स्त्री

स्त्री आपली पहीली गुरू
तिच्या गर्भात झाले आयुष्य सुरू

कधी शांत तर कधी राबराबणारी
स्त्री म्हणजे सुख दुःखात साथ देणारी

सगळ्याशी मायेने बोलणारी ती व्यक्ती
तीच खरी आहे स्त्रीशक्ती

हळवी खूप असते ती
प्रत्येक परिस्थितीत धाडसी
पण असते ती

नाही ती बापाच्या वंशाचा दिवा
पण दोन्ही घरी पेटवते दिवा

सारे जीवन फुलवणारी
सर्व आयुष्याचे कारण तू...

**कु.लक्ष्मी (हर्षदा)**
**रामेश्वर एखंडे**












आधुनिक विचारांचे वर्तमान

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय,23, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022, ■ **सल्लागार संपादक : चंद्रकांत शेजुळ**